पोलीस स्टेशन भाग्यनगर
नांदेड

I-O प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नांदेड  **P.S.(ठाणे):** भाग्य नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0403  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/11/2023 06:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date From (दिनांक पासून):** 01/11/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/11/2023
**Time From (वेळेपासून):** 20:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पौलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/11/2023  **Time (वेळ):** 06:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 008
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/11/2023 06:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सार्वजनिक बांधकाम मंडळ ,कार्यालय,नांदेडचे ईमारतीत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दादाराव शावजी ढगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पिपंळकौठा ता मुदखेड,जि नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पिपंळकौठा ता मुदखेड,जि नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8975272727

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गजेद्र हिरालाल राजपुत | | | १. ह मु विश्वकर्मा शासकीय, निवासस्थान, सार्वजनिक बांधकाम ,नांदेड,भाग्य नगर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | विनोद किशनराव कंधारे | | | १. श्री निवास, शारदा नगर,,नांदेड, भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम | 640,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | इतर मिळुन आलेली रक्कम | 4,859,900.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

5,499,900.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 02/11/2023 मी दादाराव शावजी ढगे, वय 52 वर्ष, व्यवसाय ठेकेदार, रा. पिपंळकौठा ता.मुदखेड जि.नांदेड मो.नं 8975272727 अधार कार्ड नं-641251397951

पोलीस स्टेशन भाग्यनगर येथे समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन दिनांक 31/10/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड चे कार्यालयात पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके यांचेकडे तक्रार दिली होती की, माझे ओमकार कंन्सट्रक्षन फर्म आहे. केदारगुडा, पिंगळी, डोंगरगाव, हदगाव, गोरलेगाव, गुरफळी रोड एम.डी.आर, 14 कि.मी 12/00 ते 17/00 ता.हदगाव जि.नांदेड आणि केदारगुडा पिपंळी डोगरगाव हदगाव गोरेगाव गुरफळी रोड एम.डी.आर, 14 कि.मी 17/00 ते 00/00 ता. हदगाव जि. नांदेड या रस्त्याचे दोन कामाचे टेंडर माझे ओमकार कंन्सट्रक्षन फर्मला मिळाले असुन सदर कामाच्या निवीदा स्विकृतीची शिफारस होणे बाकी आहे.

माझ्या वरील कामाच्या अनुशंगाने मी दि. 30/10/2023 रोजी 12.00 वाजण्याच्या सुमारास लोकसेवक अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड यांचे कार्यालयात जावून लोकसेवक श्री ग.ही राजपुत, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांची भेट घेतली असता त्यांनी मला मंजुर झालेल्या दोन टेंडरची एकुन रक्कम 14 कोटी 10 लाख रूपयाच्या अर्धा टक्का रक्कम असे सरसकट 7 लाख रूपयाची मागणी केली व सदर पैसे दिले तर पुढे मुख्य अभियंता नंांदेड यांचे कडे शिफारस करतो असे त्यांनी सागितले आहे.

त्यानंतर मी संबधीत टेबलचे श्री विनोद कंधारे, वरिष्ठ लिपीक, टेंडर विभाग यांना भेटलो असता त्यांनी सगळ्या सेक्षनसाठी प्रत्येक टेंडरचे 25000/- रूपये असे एकुन 50000/- रूपयेची मागणी केली आहे.

लोकसेवक ग.ही राजपूत, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड व श्री विंनोद कंधारे वरिष्ठ लिपीक, टेंडर विभाग हे मागत असलेले पैसे हे लाच असल्याचे मला माहित आहे. परंतु मी त्यांना पैसे दिले नाही तर ते माझे काम करणार नाहीत म्हणुन मी त्यांना होकार देवून आलो होतो. मला नमुद लोकसेवक यांना लाच देण्याची इच्छा नसुन आमच्यात कोणताही देण्याघेण्याचा आर्थिक व्यवहार किवा वैर दुश्मणी नाही.

तरी मी दिनांक 31/10/2023 रोजी लोकसेवक यांचे कार्यालय अधीक्षक अभियंता सार्वजनिक बाधंकाम विभाग नांदेड येथे जावून लोकसेवक यांची भेट घेणार आहे. भेटी दरम्याण नमुद लोकसेवक यांने स्वताः किवा इतरामार्फत लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही होणेस विंनती आहे अशा अाशयची तक्रार मी दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीवरून दि. 31/10/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके यांनी त्यांचेसोबत आणलेले दोन पंच क्र. 1) श्री. काशीनाथ किशनराव घुगे, उप विभागीय जलसंधारण अधिकारी लघु सिंचन उप विभाग जिल्हा परिषद हिंगोली, वर्ग 1, 2) ज्ञानेश्वर नारायणराव पुंजारे, षद कनिष्ठ सहायक, वर्ग 3 नेमणुक महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद हिंगोली असे दोघांची ओळख करून दिली व सापळा पथकातील अधिकारी व अंमलदाराची ओळख करून दिली. त्यांनतर त्याठिकाणी पोकाॅ/ अरशद खान यंानी एक नवीन मेमरी कार्ड व्हाईस रेकाॅर्डर मध्ये टाकुन पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके साहेबांचे, माझे व दोन्ही पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य रेकाॅडींग करून घेतले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री कटके साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोकाॅ/अरशद खान यांनी डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून माझे गळयात अडकवून दिले. माझेसोबत पंच क्र. 1 यांना सोबत देवून सार्वजनिक बाध्ंाकाम मंडळ, नांदेड चे कार्यालयात पाठविले असता, मी त्याठिकाणी



Scanned with CamScanner

जावून लिपिक कंधारे यांना भेटलो असता, त्यांनी सगळया सेक्शनचे चाळीस करा व साहेबांचे अर्धा टक्क्याप्रमाणे करावे लागते. ते साहेबाला बोलून घ्या असे सांगितले. तेव्हा मी अधीक्षक अभियंता श्री राजपुत साहेबांना भेटण्यासाठी गेलो असता, ते कार्यालयात हजर नव्हते. म्हणून आम्ही त्यांचे शासकीय निवासस्थानी गेलो असता, त्यांनी तुम्हाला माहिती आहे, त्याप्रमाणे करा असे सांगितले. परंतु स्पष्ट बोलले नाहीत. नंतर मी ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो. व पुढील कार्यवाही दि. 01/11/2023 रोजी करण्याचे ठरले.

त्यानंतर दि. 01/11/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके यांच्या सुचनेवरून पोका ॅ/अरशद खान यांनी डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर चालु करून माझे गळयात अडकवून दिले. माझेसोबत पंच क्र. 1 यांना सोबत देवून सार्वजनिक बाध ्ं ाकाम मंडळ, नांदेड चे कार्यालयात पाठविले असता, मी त्याठिकाणी जावून अधीक्षक अभियंता श्री राजपुत साहेबांना भेटलो व त्यांना म्हणालो की, अर्धा टक्क्याप्रमाणे आपले सात लाख व्हायलेत. एखादा लाख कमी करा, सहा लाख रूपये देतो अशी विनंती केली असता, अधीक्षक अभियंता श्री राजपुत साहेबांनी ठिक आहे असे म्हणून पंचासमक्ष मला होकार देवून सदर पैसे त्यांचे कार्यालयातील लिपिक कंधारे यांच्याकडे देण्यास सांगितले.

त्यानंतर मी लिपिक श्री कंधारे यं ाच्याकडे गेलो व त्यांना राजपुत साहेबांनी तुम्हाला भेटायला सांगितले आहे, साहेबाला बोललो सहा लाख रूपये केले, एक लाख रूपये कमी केले. तुमच्याकडे सहा लाख रूपये दयायला सांगितले आणि तुमचे दोन टेंडरचे प्रत्येकी 20 हजार प्रमाणे 40 हजार असे एकुण 6 लाख 40 हजार रूपये व्हायलेत असे सांगितले. तेव्हा श्री लिपिक कंधारे यांनी सहा चाळीस देणार ? असे विचारले. तेव्हा मी त्यांना सहा चाळीस, दोन टेंडर आहे ना असे म्हणालो असता, लिपिक कंधारे यांनी हो म्हणून 6 लाख 40 हजार रूपये घेण्यास पंचासमक्ष होकार दर्शविला. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड चे कार्यालयात परत आलो. तेव्हा पोका ॅ/अरशद खान यांनी माझे गळयातील डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर काढून बंद केले व डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर मधील संभाषण पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके यांनी ए ेकले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके साहेबांच्या सुचनेवरून पोलीस निरीक्षक श्री गजानन बोडके साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना सापळा पुर्व कार्यवाही करून अ ॅन्थ्रा ॅसिन पावडरचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच सापळा कार्यवाही अनुशंगाने पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके साहेबांनी सर्व सापळा पथकास तसेच मला सविस्तर सुचना दिल्या. तसेच सापळा कार्यवाही दरम्यान सापळा पथकातील सदस्यांनी कोणी काय करावे याबाबत प्रत्येकाची जबाबदारी निश्चीत केली. तसेच मी सापळा कार्यवाही कामी हजर केलेल्या 6,40,0000 /-रूपयाच्या रक्कमेस ज्यात 500/- रू. दराच्या 1280 चलनी नोटांचे क्रमांक पंच क्रंमाक दोन व इतर पोलीस अंमलदार यांनी नोंदवुन घेतले. त्यानंतर सदरील नोटांना पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री गजानन बोडके साहेबांनी अ ॅन्थ्रा ॅसिन पावडर लावुन सदरील नोटा पंचासमक्ष माझ्या नेहरू शर्टचे दोन्ही खिश्यात प्रत्येकी तीन लाख रूपये व वरील खिश्यात 40,000/- रूपये ठेवले व लिपिक श्री कंधारे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डोळयावरील चश्मा काढून हातात धरण्याचा ईशारा बाबत समजावुन सांगीतले. त्यानंतर लोकसेवकास भेटण्याचे ठिकाण निश्चित करण्यासाठी पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके साहेबांच्या सुचनेवरून मी माझ्या मोबाईल क्रमांक 9673437103 वरुन लिपिक श्री खंदारे यांचे मोबाईल क्र. 9850011934 वर सायंकाळी 7.49 वाजता फोन केला व तुम्ही कुठे आहेत सर अशी विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे कार्यालयात दहा मिनीटे आहो असे सांगितले, तेव्हा मी त्यांना ठिक आहे, दहा, पंधरा मिनीटे थांबा मी यायलो असे सांगितले. तेव्हा लिपिक श्री कंधारे यांनी ठिक आहे या असे सांगितले. सदरचे संभाषण हे पोका ॅ/अरशद खान यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर मध्ये रेका ॅर्ड करून घेतले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके साहेबांच्या सुचनेवरून पोका ॅ/अरशद खान यांनी लगेच डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर पुन्हा चालु करून माझे गळयात अडकावून दिले. तेव्हा मी व पंच क्र. 1 असे आम्ही दोघे माझेजवळील चारचाकी बोलेरो वाहन क्रमांक एमएच 26 व्हीएक्स 1720 ने ला.प्र.वि. कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेडचे कार्यालयातून सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालय, नांदेड येथे जाण्यासाठी रवाना झालो. आमच्या पाठीमागे काही अंतरावर पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके व त्यांचे सोबतची टिम पण आली. मी सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालय, नांदेडचे कार्यालयात जावून लिपिक श्री कंधारे यांना भेटलो व त्यांना राजपुत साहेबांनी सं ागितल्याप्रमाणे त्यांचे सहा लाख रूपये व तुमचे दोन टेंडरचे प्रत्येकी वीस हजार रूपये असे एकुण 6 लाख 40 हजार रूपये आणले आहेत असे सांगून माझे नेहरू शर्टचे बाजुच्या दोन्ही खिश्यातून प्रत्येकी तीन लाख व शर्टचे वरील खिश्यातून चाळीस हजार रूपये असे अ ॅथा ्रसिंन पावडर लावलेले एकुण 6 लाख 40 हजार रूपये लाचेची रक्कम काढून लिपिक श्री कंधारे यांच्याकडे दिली असता, त्यांनी त्यांचे हातात घेवून ते त्यांच्याजवळील मोठया लिफाफ्यामध्ये टाकु लागले. तेव्हा मी लिपिक श्री कंधारे यांनी लाच स्विकारल्याचा ईशारा देताच आमच्यावर



Scanned with CamScanner

दुरून लक्ष ठेवून असलेले पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके साहेब व त्यांचे टिमचे पोलीस अंमलदार हे त्याठिकाणी आले व त्यांनी लिपिक श्री कंधारे यांना रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके साहेबांनी कार्यालयातील सर्व लाईट बंद करून अंधार करून लिपिक श्री कंधारे यांच्या हाताचे बोटावर अॅॅन्थ्रासिन पावडर लागले किंवा नाही हे अल्ट्राव्हाॅयलेट लॅम्पच्या सहायाने पाहिले असता, लिपिक श्री कंधारे यांच्या दोन्ही हाताचे बोटाचे पे-यावर समोरील बाजुस हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच टेबलवर व टेबलचे ड्राॅवर मध्ये पण अॅन्थ्रासिन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके साहेबांनी पंच क्र. 2 यांना लिपिक श्री कंधारे यांच्याकडे असलेली लाचेची रक्कम व ला.प्र.वि. कार्यालयात नोंद केलेली रक्कमांचे क्रमांक एकच आहेत का हे पाहण्यास सांगितले असता, पंच क्र. 2 यांनी ला.प्र.वि. कार्यालयात नोंद केलेल्या नोटांचे क्रमांकाची यादी काढून नमूद नोटा चेक करून ते एकच असल्याचे सांगितले.

तसेच श्री कंधारे यांचे टेबलची तपासणी करित असतांना त्यांचे टेबलचे ड्राॅवरखाली मोठया कप्प्यात सुमारे 48,59,900/- रूपये एवढी रक्कम मिळून आली. लिपीक श्री कंधारे यांच्याजवळ मिळून आलेली रक्कम 48,59,900/- रूपये व लाचेची रक्कम 6,40,000/- रूपये असे दोन्ही रक्कमा पंचासमक्ष हस्तगत करून जप्त केल्या आहेत.

त्यानंतर लिपिक श्री कंधारे यांना ताब्यात घेवून ला.प्र.वि.कार्यालय, नांदेड येथे आणले. त्यानंतर त्यांचेकडे विचारपुस करून दोन्ही पंचासमक्ष घडलेल्या घटनाक्रमानुसार पंचानी सांगीतल्या प्रमाणे लाचमागणी पडताळणी व सापळा कार्यवाही पंचनामा तयार करण्यात आला आहे.

माझे निवीदा स्विकृतीचे शिफारसीसाठी सार्वजनिक बांधकाम मंडळ ,नांदेड चे गजेंद्र हिरालाल राजपुत, वय 54 वर्ष, पद अधीक्षक अभियंता, (वर्ग-1) ने. सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, रा. दिशा संस्कृती इटखेडा, फ्लैट क्र. ए-3/203, पैठण रोड, औरंगाबाद, ह.मु. विश्वकर्मा शासकीय निवासस्थान, सार्वजनिक बांधकाम क्वार्टर्स, नांदेड यांनी स्व:तासाठी सहा लाख रुपये लाच स्विकारण्यास सहमती देवुन सदर लाच रक्कम त्यांचे कार्यालयातील लिपिक श्री.कंधारे यांचे कडे देण्यास सांगितले. लिपिक विनोद किशनराव कंधारे, वय 47 वर्ष, पद वरिष्ठ लिपिक, वर्ग -3, ने. निविदा शाखा, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, रा. श्री निवास, शारदा नगर, नांदेड यांनी स्व: तासाठी व सगळ्या सेक्शनसाठी चाळीस हजार रुपयाची मागणी केली आणि श्री.राजपुत साहेबांचे सहा लाख,स्व: तासाठी व सेक्शनसाठी चाळीस हजार असे एकुण 6,40,000/- रूपयाची लाच रक्कम पंचा समक्ष त्यांचे कार्यालयात दिनांक 01/11/2023 रोजी 2010 वाजता स्विकारली म्हणुन माझी त्या दोघांविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

suryamohan narayan bolmvad(I (Inspector)) / dapsnbm8107 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो. स्टे. भाग्यनगर, नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): suryamohan naraya
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): dgpsnbm8107



Scanned with CamScanner